# *महाराष्ट्र विधानसभा*

## *दिवसाच्या कामकाजाचा क्रम*
## *गुरुवार, दिनांक ६ एप्रिल, २०१७*
## *(सकाळी ११.०० वाजता)*

*एक : प्रश्नोत्तरे.*

*(अ) तारांकित प्रश्न.*

*(ब) अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक २६० ते २८५ सभागृहाच्या पटलावर ठेवणे.*

*दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -*

*(१) मुख्यमंत्री : (क) माहितीचा अधिनियम, २००५ च्या कलम २४ च्या पोट-कलम (४) द्वारे महाराष्ट्र शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीआरटीआय- २००५/प्र.क्र. २६५/०५/५, दिनांक ११ ऑक्टोबर, २००५ मध्ये केलेली सुधारणा प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक आरटीआय, २०१६/प्र.क्र.६८/ सहा., दिनांकित ७ सप्टेंबर, २०१६ सभागृहासमोर ठेवतील.*

*(ख) लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त महाराष्ट्र राज्य यांचे सन २०१३ या वर्षाचा एकेचाळीसावा व सन २०१४ या वर्षाचा बेचाळीसावा वार्षिक अहवाल तसेच ९ डिसेंबर, २०११, ९ ऑक्टोबर, २०१२, १३ फेब्रुवारी, २०१३, १६ एप्रिल, २०१३, २२ मे, २०१३, ३० जुलै, २०१३, १ ऑगस्ट, २०१३, ६ ऑगस्ट, २०१३, २१ ऑगस्ट, २०१३, ७ सप्टेंबर, २०१३, २६ नोव्हेंबर, २०१३, २६ नोव्हेंबर, २०१३, २६ नोव्हेंबर, २०१३, २६ नोव्हेंबर, २०१३, १० डिसेंबर, २०१३, १९ डिसेंबर, २०१३, १९*

डिसेंबर, २०१३, १ फेब्रुवारी, २०१४, १४ फेब्रुवारी, २०१४, २९ एप्रिल, २०१४, ९ मे, २०१४, २९ मे, २०१४, २३ जून, २०१४, २४ जून, २०१४ आणि ३० जून, २०१४ रोजीचे विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवतील.

(२) उच्च व तंत्र शिक्षण आणि अल्पसंख्याक विकास मंत्री :

(क) मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २००९-२०१० या वर्षाचा दहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०१२-२०१३ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ग) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(३) कृषि मंत्री : डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचा सन २००६-२००७ ते २००९-२०१० या वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल व वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

तीन : रोजगार हमी योजना समितीचा चौथा अहवाल सादर करणे.

चार : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा पाचवा अहवाल सादर करणे.

पाच : उपविधान समितीचा चौथा अहवाल सादर करणे.

सहा : महिलांचे हक्क व कल्याण समितीचा सहावा अहवाल सादर करणे.

सात : "पांढुर्णा (जि.वर्धा) येथील शासकीय आश्रमशाळेसह राज्यातील अन्य आश्रमशाळा व वसतीगृहातील मुलींवर झालेल्या अत्याचार प्रकरणाची सखोल चौकशी करणे" या विषयावरील महिला संयुक्त तदर्थ समितीचा अहवाल सभागृहास सादर करणे.

*आठ : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.*

*नऊ : स्थगन प्रस्तावाच्या सूचना – (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).*

*दहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :*

*(दिनांक २९ मार्च, २०१७ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्र.१)*

*(१) सर्वश्री. दिलीप वळसे-पाटील, अजित पवार, जयंत पाटील, पांडुरंग बरोरा, शशिकांत शिंदे, राधाकृष्ण विखे-पाटील, अमीन पटेल, सुनिल केदार, मो. आरिफ (नसीम) खान, अजय चौधरी, जयदत्त क्षीरसागर, राजेश टोपे, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. सुरेश लाड, हसन मुश्रीफ. वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-*

*"महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून दि. २८ फेब्रुवारी, २०१७ पासून सुरु करण्यात आलेल्या बारावीच्या परिक्षेची प्रश्नपत्रिका परिक्षा सुरु होण्या अगोदर तब्बल २५ मिनिटांपूर्वी म्हणजेच १०.४० मिनीटांनी प्रश्नपत्रिका व्हॉटसॲपवर उपलब्ध झाल्याचे निदर्शनास येणे, विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी देण्यात आली असतानाच ही घटना घडल्याचे पुन्हा एकदा समोर येणे, इंग्रजी, गाणित, एसपी आणि मराठी या विषयांच्या प्रश्नपत्रिका मुंबई परिसरात व्हॉटसॲप या सामाजिक माध्यमावर उपलब्ध झाल्याचे समोर येणे, याबाबत मंडळाच्या मुंबई विभागीय कार्यालयाकडून तसेच शासनाकडून कोणतीच दखल घेतली न जाणे, त्यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया".*

*(दिनांक १ एप्रिल, २०१७ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्र.१)*

*(२) सर्वश्री. चंद्रदीप नरके, सत्यजीत पाटील, ॲड. रामचंद्र अवसरे, श्री. चरण वाघमारे, ॲड.राहूल कुल, ॲड. भिमराव धोंडे, श्री. सुनिल शिंदे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-*

*"राज्यातील जवळजवळ २९ जिल्हयांमधील सर्व महाराष्ट्र राज्य कृषी व ग्रामीण विकास बँका (भुविकास बँका) अवसायनामध्ये काढण्यात आल्या असणे, सदर बँकांची सर्वच्या सर्व मालमत्ता राज्य शासनाने आपल्या ताब्यात घेतली*

*असणे, सध्याच्या बाजारभावाने सदर मालमत्तेची किंमत जवळ जवळ २००० कोटी रुपये इतकी असणे, बँकेच्या सर्व मालमत्ता या शेतकऱ्यांच्या असणे, शासनाने बँक अवसायनामध्ये काढल्यानंतर बँकेच्या कर्मचाऱ्यांची देणी, तसेच शेतक-यांची सर्व कर्जे माफ करण्याबाबतचे आश्वासन दिले असणे, राज्यातील बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांची देणी २५० कोटी रुपये व शेतकऱ्यांची कर्जे २५० कोटी रुपये असणे, सध्या कोल्हापूर जिल्हयामध्ये शेतकऱ्यांचे ७/१२ लिलावामध्ये काढण्याची प्रक्रिया सुरु असणे, यामूळे भुविकास बँक कर्मचारी व कर्जदार शेतकरी यांच्यामध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."*

*(३) श्री. अतुल भातखळकर, ॲड. पराग अळवणी, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री. नरेंद्र मेहता, प्रशांत ठाकूर, संजय केळकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-*

*"मुंबईकरांच्या रेल्वे प्रवास सुखकर होण्यासाठी एमयुटीपी-२ व एमयुटीपी-३ या प्रकल्पाच्या अंतर्गत अनेक प्रकल्प हाती घेतले असून अनेक प्रकल्पांचे काम प्रगती पथावर असणे, मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रोजेक्टप्रमाणेच (एमयुटीपी-३) वांद्रे-विरार उन्नत प्रकल्प, सीएसटी-पनवेल उन्नत प्रकल्प आणि वसई-विरार-पनवेल जोडमार्ग या तीन मेगा प्रकल्पांसाठी रु १०,०५५ कोटीच्या निधीची आवश्यकता असणे, एमयुटीपी-३ या प्रकल्पांसाठी आवश्यक असलेल्या निधीपैकी सन २०१७-१८ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात रु ४११ कोटींची तरतूद केलेली असून प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी केंद्राप्रमाणे राज्य शासनाने या प्रकल्पांसाठी रु ४११ कोटीची तरतूद करणे अपेक्षित असणे, याचबरोबर एमयुटीपी-२ मधील काही प्रकल्पही अद्याप पूर्ण झाले नसल्याने यासाठीही रु.२४७ कोटी निधीची आवश्यकता असल्याने व मुंबईकर जनतेचा प्रवास सुखकर होण्यासाठी राज्य शासनाने त्वरित निधीची तरतूद करून कामे सुरु करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."*

*(४) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-*

*"पहाडी व्हिलेज, जय प्रकाश नगर गोरेगाव (पूर्व) येथील, सीएसक्र. ८८२ मधील जागेत भागीरथ कंडोमिनीयमच्या पुनर्विकास प्रकल्पात आर्केड डेव्हलपर्स या कंपनीच्या विकासकाने मोठया प्रमाणात गैरव्यवहार आणि अनियमितता करुन मुळ रहिवाशांची फसवणूक केल्याचे प्रकरण नुकतेच निदर्शनास येणे, सदर पुनर्विकास प्रकल्पात १८ मजल्याची परवानगी असताना यामध्ये आणखी ३ मजल्याचे अनधिकृत बांधकाम करुन शासन व महापालिकेची केलेली फसवणूक,*

*मुळ रहिवाशांना करारानुसार सदनिकेचे क्षेत्रफळ न देता २५ टक्के क्षेत्रफळ कमी देणे, दहा महिने संक्रमण शिबीर गाळयाचे भाडे तसेच, कॉर्पस फंडाची रक्कम अनेकवेळा मागणी करुनही अद्यापपर्यंत रहिवाशांना देण्यात न येणे, मुळ रहिवाशांना बांधकाम पूर्ण झालेल्या इमारतीत अद्यापही सदनिकेचा ताबा न देता विक्री इमारतीतील गाळे पालिकेचा अंतिम पूर्णत्वाचा दाखला न घेताच बाहेरील व्यक्तींना बेकायदा विक्री करुन गाळयाचा ताबा देण्यात येणे, सदर पुनर्विकास प्रकल्पात पुनर्वसनाचे गाळे ताब्यात देण्याबाबत विकासक, हेतूपूर्वक विलंब करीत असल्याने बेघर व बेदखल होण्याची रहिवाशांमध्ये निर्माण झालेली भिती, या संदर्भात रहिवाशांनी अनेकवेळा शासनाकडे लेखी तक्रार करुनही अद्याप यावर कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याकडे झालेले शासनाचे दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*(५) सर्वश्री.तान्हाजी मुटकुळे, बाळासाहेब मुरकुटे, नरेंद्र पवार, आर .टी. देशमुख, पास्कल धनारे, किर्तीकुमार उर्फ बंटी भांगडीया, डॉ.मिलिंद माने, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-*

*"मौजे बळसोंड जि. हिंगोली येथील जुना शेत सर्व्हे क्र.-४ नविन गट १२ एकुण क्षेत्रफळ ३० एकर २१ गुंठे ही पूर्वी शासनाच्या मालकीची गायरान जमिन असणे, ही शेतजमीन हिंगोली शहरालगत असून बाजारमूल्यानुसार तिची किंमत जास्त असणे, सदर शेत जमिनीवर शासनाव्यतिरिक्त इतर कोणाचीही मालकी नसताना सदर जमीन भोगवटादार वर्ग –२ ची असताना ७/१२ उता-यावर भोगवटादार वर्ग -१ म्हणून श्री.केशव गवळी (रा.पारोळा, ता.जि.हिंगोली) यांच्या नावाची नोंद करणे, परंतु या नावाची व्यक्ती अस्तित्वात नसतांना श्री.राजेश पाटील गोरेगावकर यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे शेत जमिनीवर अनधिकृतरित्या इमारतीचे बांधकाम करुन ती इमारत पोतदार इंटरनॅशनल स्कूल या शैक्षणिक संस्थेस भाड्याने दिलेली असणे, सदर प्रकरणी चौकशी करुन संबंधितांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*(६) श्री.ज्ञानराज चौगुले, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा मंत्र्याचे लक्ष वेधतील :-*

*"कृष्णा मराठवाडा प्रकल्प हा मराठवाड्यातील अवर्षणप्रवण उस्मानाबाद व बीड जिल्ह्यातील एकमेव सिंचन प्रकल्पाच्या काही कामांच्या निविदा निश्चित करण्यात आलेल्या असणे, परंतू शेवटच्या टप्प्यातील निविदा प्रकल्पास पर्यावरण विभागाने मान्यता न देणे, त्यानंतर निविदा निश्चित करण्यासाठी कंत्राटदाराच्या*

*पात्रतेविषयक अटीमध्ये शासनाने बदल केल्यामुळे कृष्णा मराठवाडा प्रकल्पांतर्गत तुळजापूर तालुक्यातील धनेगांव साठवण तलावाची निविदा निश्चित होऊ शकलेली नसणे, या प्रकल्पाची कामे अपु-या निधीमुळे व पर्यावरणाबाबत मान्यता नसल्यामुळे रेंगाळलेली असणे, धनेगांव साठवण तलावाच्या निविदा निश्चितीची कार्यवाही निविदा अर्हता बदलापुर्वीची असल्यामुळे ही निविदा निश्चित करुन कामे सुरु करण्याची आग्रही मागणी शासनाकडे शेतकरी वर्गाकडून सातत्याने होत असणे, शासनाने याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याची आवश्यकता व प्रतिक्रिया.''*

*(७) सर्वश्री. राधाकृष्ण विखे-पाटील, अमीन पटेल, अमित देशमुख, अब्दुल सत्तार, मो. आरिफ (नसीम) खान, सुनिल केदार, अस्लम शेख, पृथ्वीराज चव्हाण, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. कालीदास कोळंबकर, डॉ. संतोष टारफे, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री. शेख आसिफ शेख रशिद, कुणाल पाटील, संग्राम थोपटे, डॉ. पंतगराव कदम, डॉ. सतीश पाटील, डॉ राहुल पाटील, सर्वश्री. सुनिल प्रभु, सुनिल शिंदे, पंकज भुजबळ, छगन भुजबळ, जयंत पाटील, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, शशिकांत शिंदे, संदीप नाईक, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री. हसन मुश्रीफ, जयदत्त क्षीरसागर, सुरेश लाड, राजन साळवी, ॲड. राहूल कुल वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पणन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-*

*"दुप्पट आवक झाल्यामुळे कांद्याचा राज्याबाहेर निपटारा करण्यात येत असलेल्या अडचणी, नोटबंदीमुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असतांना त्यात कांद्याचे भाव सातत्याने घसरत असून उत्पादन खर्चही निघत नसल्याने शेतकरी हवालदिल होणे, विक्री केलेल्या कांद्याचे धनादेश वटत नसल्यामुळे मजुरांची मजुरी देण्यासाठी शेतकऱ्यांकडे पैसे नसणे, परिणामी नरसूल ता.येवळा, जि.नाशिक येथील शेतकऱ्याने शेतातील कांद्याचे पिक जाळून टाकल्याचे दिनांक १४ फेब्रुवारी, २०१७ रोजी निदर्शनास येणे, सबब कांद्याचे घसरणारे भाव नियंत्रणात आणण्यासाठी विविध संघटनांनी व बाजार समितींनी याबाबत उपाययोजना करण्याची शासनाकडे मागणी करुनही त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया."*

*अकरा : अंतिम आठवडा प्रस्ताव :-*

*सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, डॉ.पंतगराव कदम, सर्वश्री शशिकांत शिंदे, बाळासाहेब थोरात, जयदत्त क्षीरसागर, प्रा.विरेंद्र जगताप, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री. अब्दुल सत्तार, दिलीप सोपल, अमीन पटेल, गोपालदास अग्रवाल, ॲड. यशोमती ठाकूर, श्री.हसन मुश्रीफ,*

*डॉ. सतीश पाटील, सर्वश्री मो. आरीफ नसीम खान, राहुल मोटे, सुनिल केदार, डी.एस.अहिरे, राजेश टोपे, डी.पी.सावंत, मधुकरराव चव्हाण, शिवेंद्रसिंह भोसले, कालीदास कोळंबकर, दत्तात्रय भरणे, बसवराज पाटील, बाळासाहेब पाटील, वसंतराव चव्हाण, हनुमंत डोळस, रणजित कांबळे, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री काशीराम पावरा, अवधुत तटकरे, विजय भांबळे, राहुल बोंद्रे, वैभव पिचड, नितेश राणे, अमित झनक, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ.संतोष टारफे, श्री.शेख आसिफ शेख रशीद, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री अस्लम शेख, भारत भालके, संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, त्र्यंबकराव भिसे, कु.प्रणिती शिंदे, सर्वश्री सिध्दाराम म्हेत्रे, सुरेश लाड, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव :*

*"कधी नापिकी तर कधी पुरेसे उत्पादन होऊनही रास्त दर मिळत नसल्याने शेतकरी संकटात सापडणे, व्यापाऱ्यांची चलाखी, शेतीविषयक बदलणारी सरकारी धोरणे व त्यात नोटाबंदीच्या अनपेक्षित निर्णयामुळे शेतकरी अजूनच अडचणीत येणे, जिल्हा बँकांवर लादलेल्या निर्बंधामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था डबघाईला येणे, लागोपाठ तीन वर्षातील दुष्काळाचा मोठा फटका राज्यातील साखर उद्योगासोबत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना बसून सुमारे सहा हजार कोटी रुपयांच्या उत्पन्नाला मुकावे लागणे, डॉ.स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशीकडे करण्यात आलेले दुर्लक्ष, घसरलेल्या दरामुळे ऊस, कापूस, तूर, धान, कांदा, टोमॅटो, सोयाबीन, भाजीपाला तसेच संत्रा व केळी उत्पादक शेतकरी कोलमडणे, यावर्षी कडधान्य उत्पादनात झालेली वाढ, परिणामी कडधान्य बाजारभाव गेल्या पाच वर्षातील निचांक पातळीवर जाणे, शासनाने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमतीपेक्षा कमी दराने व्यापाऱ्यांकडून सुरु असलेली खरेदी, शासनाने निर्यात बंदी करुन कांदा उत्पादकांची केलेली कोंडी, हवामान आधारीत फळ पीक विम्याचा हप्ता शासनाने न भरल्यामुळे हजारो शेतकरी विम्याच्या लाभापासून वंचित राहणे, ठिबक सिंचनाचे ६२२ कोटी रुपयांचे अनुदान देण्याबाबत दिलेल्या आश्वासनाची पुर्तता न होणे, कोरडवाहू शेती अभियानाच्या आर्थिक तरतुदीत ८० टक्क्याहून अधिक करण्यात आलेली कपात, अपघात योजनेची ५० टक्के रक्कमही शेतकऱ्यांना न मिळणे, कृषी विभागात हजारो रिक्त पदांचा असलेला अनुशेष, परिणामी योजनांची अंमलबजावणी होण्यास येणाऱ्या अडचणी, खरेदी केंद्रावरील आवक वाढल्याने व दिनांक ५ जानेवारी, २०१७ पासून नाफेडकडून उडीद खरेदी बंद करण्यात आल्यामुळे खाजगी व्यापाऱ्यांनी उडदाचे दर पाडणे, आपल्या मागण्याच्या संदर्भात राज्यातील शेतकऱ्यांनी संपावर जाण्याचा घेतलेला निर्णय, गेल्या दोन वर्षात राज्यात आठ हजारहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची माहिती कृषी व शेतकरी कल्याण विभागाच्या केंद्रीय राज्यमंत्र्यांनी संसदेत देणे, उत्तर*

*प्रदेशातील शेतकऱ्यांना करण्यात आलेली कर्जमाफी तसेच तामिळनाडूतील सर्व शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याचा मा.उच्च न्यायालयाने दिलेला आदेश, वर्ध्यात राबविण्यात आलेल्या पथदर्शी प्रकल्पाची राज्यात अंमलबजावणी न होणे, कर्जमाफीच्या मागणीकरिता दिनांक २९ मार्च ते ४ एप्रिल, २०१७ या कालावधीत चांदा ते बांदा दरम्यान काढण्यात आलेली संघर्ष यात्रा, सदरच्या संघर्षयात्रेत राज्यातील शेतकऱ्यांनी सहभागी होऊन संपूर्ण कर्जमाफीची केलेली मागणी, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याप्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी."*

*बारा : शासकीय विधेयके :*

*(अ) पुर:स्थापनार्थ :-*

*(१) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८— महाराष्ट्र परिवहन व रस्ते सुरक्षा विधेयक, २०१७.*

*(२) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ — प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७.*

---------------------------------------------------------------------------------------
-------

*(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-*

*(१) (क) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ — संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर विधेयक, २०१७.*

*(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अमित झनक वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २७ — संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २७ – संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २७ – संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३६ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

--------------------------------------------------------------------------------------

*(२) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ – प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७.*

*तेरा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-*

*(गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु चर्चा न झाल्यामुळे पुढे ढकलण्यात आलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) (सूचना क्र. १)*

*(१) श्री. संजय सावकारे, वि.स.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.*

*''महाराष्ट्र पोलीस दलाची स्थापना झाल्यापासून मुंबई वगळता राज्यातील इतर कोणत्याही ठिकाणच्या शस्त्रशाखांमध्ये शस्त्रतज्ञ पदे रिक्त असल्याने तात्पुरत्या तज्ज्ञांकडून लाखो शस्त्रे प्रमाणित करण्यात येणे, परिणामी शस्त्र हाताळतांना पोलीस दलात अपघात होणे, शस्त्रतज्ज्ञांची तातडीने नियुक्ती करुन*

*९० टक्के मुदतबाह्य शस्त्रे वापरातून बाहेर काढण्याबाबत होत असलेली दिरंगाई, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.''*

*(गुरुवार, दिनांक ३० मार्च, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु चर्चा न झाल्यामुळे पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (सूचना क्र. २ व ३)*

*(२) श्री. क्षितीज ठाकूर, वि.स.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.*

*"पालघर जिल्हयाची पश्चिम किनारपट्टी निसर्ग सौंदर्याने नटलेली असून तेथे चिंचणी किनारा, वाढवण किनारा, डहाणू समुद्रकिनारा, नरपड बीच, आगर, चिखला आणि बोर्डी बीच तसेच ऐतिहासिक डहाणू किल्ला या वास्तू पर्यटकांना आकर्षित करीत असणे, येथील प्रसिध्द महालक्ष्मी मंदिर, आशागडचे संतोषी माता मंदिर, याबरोबर बोर्डीचा बारडाचा गड, गंभीर गड, भीम बांध या ऐतिहासिक सांस्कृतिक स्थळांना भाविक आणि पर्यटक मोठया प्रमाणात भेटी देत असणे, येथील किनाऱ्यावरील हिरवीगार वनराई, लहान मोठी झाडे आणि येथील समुद्राचे व सुरुच्या वनांचे दर्शन नयनरम्य असून समुद्रकिनारा पर्यटकांचे लक्ष वेधून घेत असतांनाही डहाणू तालुक्यातील या पर्यटन स्थळांकडे शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे येथील पर्यटन व्यवसायाला चालना मिळत नसणे, येथील पर्यटनाला चालना मिळून स्थानिकांना रोजगारांच्या संधी उपलब्ध होण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."*

*(३) श्री. राजेश काशीवार, वि.स.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.*

*"झरी उपसा सिंचन प्रकल्पामुळे (ता. अर्जुनी मोरगांव, जि. गोंदिया) गोंदिया जिल्ह्यातील मोरगांव अर्जुनी तालुक्यातील १८ गावांना व भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदूर तालुक्यांना त्याचा लाभ मिळणार असणे, या योजनेकरीता २२७५ हेक्टर लागवड क्षेत्र आवश्यक असून हे क्षेत्र धापेवाडा टप्पा -२ अंतर्गत येत असल्यामुळे या योजनेचे लाभक्षेत्र धापेवाडा टप्पा-२ किंवा झरी उपसा सिंचन योजना यापैकी कोणत्या योजनेत समाविष्ट करावयाचे याबाबतचा अहवाल सादर करण्याचे निर्देश मंडळ कार्यालयाकडून कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन प्रकल्प विभाग, तिरोडा (जि. गोंदिया) यांना देण्यात येणे, परंतु त्यावर अद्यापही कोणती कार्यवाही करण्यात आली नसणे, सदर प्रकल्प कित्येक वर्षापासून प्रलंबित असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष, त्यामुळे शेतकऱ्यांच्या हितासाठी लागवडीयोग्य क्षेत्र ओलिताखाली आणण्याच्या दृष्टीने झरी प्रकल्प तातडीने पुर्णत्वास आणण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."*

*(सोमवार, दिनांक ३ एप्रिल, २०१७ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (सूचना क्र. ४ व ५)*

*(४) श्री. सुनिल प्रभु, वि.स.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.*

*"राज्यात मुंबईत राष्ट्रीय फेरीवाला धोरणांतर्गत फेरीवाला व ना-फेरीवाला क्षेत्र निश्चित न करणे, मुंबईत ५ ते ६ लाख फेरीवाले पदपथ व रस्त्यावर दूकान व गाडया उभ्या करुन अनधिकृत व्यवसाय करीत असल्यामुळे नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शाळा, महाविद्यालय, रुग्णालय, धार्मिक स्थळे, रेल्वे स्थानकाच्या १०० मीटर परिसरात खाद्यपदार्थ विक्री करण्यास बंदी असतांनाही त्याचे होत असलेले उल्लंघन, याकरिता शासनाने फेरीवाला धोरणाची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."*

*(५) श्री. मनोहर भोईर, वि.स.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.*

*"मुंबई व आसपासच्या समुद्रकिनाऱ्यावरील तिवरांच्या झाडांची होत असलेली बेसुमार तोड, कारखान्यांचे व इतरही सांडपाणी थेट समुद्रात सोडण्यात येत असल्यामुळे राज्यातील समुद्रकिनारे प्रदूषित होणे, केंद्र शासनाच्या समुद्र विज्ञान संस्था व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या पाहणीत बहुतांश समुद्रकिनारा प्रदूषित झाल्याचे आढळून येणे, समुद्रात मोठया प्रमाणावर होणा-या तेलगळतीमुळे किनारपट्टी डांबरसदृश्य काळया चिकट गोळयांचा थर अनेकदा पसरलेला दिसून येणे, त्यामुळे राज्यातील समुद्रकिनाऱ्यावरील वाढत्या प्रदुषणावर आळा घालण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. "*

*विधान भवन,*
*मुंबई,*
*दिनांक : ५ एप्रिल, २०१७*

*डॉ. अनंत कळसे,*
*प्रधान सचिव,*
*महाराष्ट्र विधानसभा.*